# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४००००१

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२ २२६४११५०/५१, फॅक्स २६२९२१०२

तार - EDUTECH E-mail :- desk12@dte.org.in internet :- http://www.dte.org.in


क्रमांक १२/आस्था/बदली/२०११/३८५७

दिनांक 21 OCT 2011

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती व नागपूर

**विषय : विनंती / प्रशासकीय बदली केलेल्या कर्मचा-यांचा एकत्रित अनुपालन अहवाल सादर करण्याबाबत...**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सन २०११ मध्ये आपल्या विभागातील गट क मधील कर्मचाऱ्यांच्या विभागांतर्गत विनंती / प्रशासकीय तसेच विभागीय विनंती बदलीबाबतचे या संचालनालयामार्फत वेळोवेळी आदेश निर्गमित केलेले आहेत. सदर बदल्या कार्यान्वीत करण्यासाठी आपल्या स्तरावर आवश्यक ती कार्यावाही करुन एकत्रित अनुपालन अहवाल त्वरीत या संचालनालयास सादर करण्याबाबत सदर आदेशात नमूद करण्यांत आलेले होते. परंतु असा एकत्रित अहवाल अद्याप या संचालनालयास अप्राप्त आहे.

तरी या पत्राद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, सन् २०११ मध्ये गट क मधील कर्मचाऱ्यांच्या विनंती / प्रशासकीय बदल्याच्या वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाच्या अनुषंगाने अनुपालन अहवाल खाली नमूद केलेल्या प्रपत्रात नमूद करुन तात्काळ या संचालनालयास सादर करावा. व ज्या कर्मचाऱ्यांना अद्याप बदलीच्या ठिकाणी रुजू होण्यासाठी कार्यमुक्त करण्यांत आलेले नाही त्या कर्मचा-यांना बदलीच्या ठिकाणी रुजू होण्यासाठी **तात्काळ** कार्यमुक्त करावे. तसेच अद्यापपर्यंत कां कार्यमुक्त करण्यांत आले नाही याबाबत खुलाशासह अनुपालन अहवाल सादर करण्यांत यावा.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव, पदनाम कार्यरत ठिकाण | बदलीने पदस्थापित केलेले ठिकाण / संस्था | कार्यमुक्त केल्याचा दिनांक | बदलीच्या ठिकाणी हजर झाल्याचा दिनांक | कार्यमुक्त केलेले नसल्यास त्याबाबत कारणे व पत्रव्यवहाराचा संदर्भ | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |

कार्यवाही व्हावी

सहसंचालक, तंत्रशिक्षण, वि.का. आवक ९२८९ दिनांक 1 NOV 2011

( डॉ. सुभाष महाजन )
प्र. संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

---

प्रति,

पृ.पत्र क्र.विकाऔ/आस्था-३/२०११/८६३९

दिनांक :- ०२/११/२०११

१.प्राचार्य,शास.अभि.महा.औ.बाद/शास.औषधनिर्माणशास्त्र महा.औ.बाद
२.प्राचार्य,सर्व शासकीय तंत्रनिकेतने, ३.उपसचिव,म.रा.तं.शि.मं.प्रा.का.औ.बाद

उपरोक्त पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील गट क मधील कर्मचा-यांच्या विभागांतर्गत विनंती / प्रशासकीय तसेच विभागीय विनंती बदली बाबत आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.सदर आदेशाच्या अनुषंगाने अनुपालन अहवालाची माहिती उपरोक्त पत्रात नमूद विवरणपत्रात भरुन अतितात्काळ या कार्यालयाच्या इमेल वर पाठविण्यात यावी व बदलीच्या ठिकाणी रुजू होण्यासाठी सदर कर्मचा-यांना कार्यमुक्त करावे व अद्यापपर्यंत कार्यमुक्त केले नसल्यास त्याबाबतचा खुलासा या कार्यालयास सादर करण्यात यावा.

सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

प्रत :- या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी अग्रेषित.